**मा.संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय तथा सक्षम प्राधिकारी यांचेसमोर**

(क्र.०५/ व्हिओसी/सुनावणी/~~२०२५~~ २०२६/ ०५)

**महाराष्ट्र राज्यात कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करणे आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरु करणे (प्रतिबंध) अधिनियम २०१३ अन्वये अर्ज.**

**सहसंचालक**
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय,घोलेरोड पुणे ... अर्जदार

**विरुध्द**

**कार्यकारी संचालक**
रामचंद्र मसू महाडीक ज्युनिअर कॉलेज,
पेठ, ता. वाळवा, जि. सांगली ... प्रतिवादी

## प्रस्तावना

महाराष्ट्र राज्यात कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करणे व अनधिकृत अभ्यासक्रम सुरू करणे (प्रतिबंध) अधिनियम, २०१३ चे कलम ५ व "महाराष्ट्र कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यासक्रम (तक्रारी, अपील व सुधारात्मक उपाययोजना) नियम, २०२४" निर्गमित केले आहेत.

## पूर्वपीठिका

१. रामचंद्र मसू महाडीक ज्युनिअर कॉलेज, पेठ, ता. वाळवा, जि. सांगली यांनी त्यांच्या दिनांक १४/१०/२०२४ च्या पत्रानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये इलेक्ट्रीकल मेन्टेनन्स या व्यवसाय अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या तुकडीस मान्यता नसताना ३० विद्यार्थ्यांना प्रवेश दिले आहेत. सदर विद्यार्थी फेब्रुवारी २०२५ ची १२ वी बोर्ड परीक्षा देणार आहेत. या विद्यार्थ्यांना परीक्षेस बसण्यासाठी विशेष बाब म्हणून मान्यता मिळण्यासाठी मा. संचालक यांना प्रस्ताव सादर करावा अशी विनंती जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, सांगली यांना केली.
२. त्या अनुषंगाने सहसंचालक, प्रादेशिक कार्यालय, पुणे यांनी दिनांक २२/११/२०२४ रोजीच्या पत्रान्वये सदर बाब संचालनालयास सादर केली. सबब संस्थेने शासनाची मान्यता नसताना इलेक्ट्रीकल मेन्टेनन्स या अभ्यासक्रमात प्रवेश देऊन महाराष्ट्र राज्यात कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करणे आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरु करणे (प्रतिबंध) अधिनियम २०१३ या अधिनियमाचे उल्लंघन केले आहे.

## सुनावणी

सदर प्रकरणाची सुनावणी दिनांक **१७/०१/२०२५** रोजी आयोजित केल्याबाबत संचालनालयाच्या दिनांक **०९/०१/२०२५** रोजीच्या पत्राद्वारे संस्थेस कळविण्यात आले होते. तथापि, दिनांक **१७/०१/२०२५** रोजी मा. संचालक यांची मंत्रालयात तातडीची बैठक असल्याने सदर सुनावणी रद्द करण्यात आली.त्यानंतर सदर प्रकरणाची सुनावणी दिनांक **१४/१०/२०२५** रोजी आयोजित केल्याबाबत संचालनालयाच्या दिनांक **२९/०९/२०२५** रोजीच्या पत्राद्वारे संस्थेस कळविण्यात आले. तथापि, दिनांक **१४/१०/२०२५** रोजी अपरिहार्य कारणास्तव सदर सुनावणी रद्द करण्यात आली.त्यानंतर सदर प्रकरणाची सुनावणी दिनांक **२५/११/२०२५** रोजी आयोजित केल्याबाबत संचालनालयाच्या दिनांक **२०/११/२०२५** रोजीच्या पत्राद्वारे संस्थेस कळविण्यात आले असून, संचालनालयाच्या दिनांक ७ ऑगस्ट २०२५ च्या सुधारित कार्यालयीन आदेशान्वये गठीत करण्यात आलेल्या

सत्यशोधन समितीच्या (Fact Finding Committee) दिनांक १८/०९/२५ च्या अहवालानुसार सदर संस्थेची अंतिम सुनावणी दिनांक २५ नोव्हेंबर २०२५ रोजी घेण्यात आली.

३. सुनावणीस खालील अधिकारी/प्रतिनिधी उपस्थित होते :

- श्री. नि. आ. निकम, उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, संचालनालय, मुंबई
- श्रीमती सोनम चौधरी, सहायक संचालक (तांत्रिक), संचालनालय, मुंबई
- श्री. एम. डी. जोशी, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, सांगली
- प्रतिवादी संस्थेच्या वतीने प्राचार्य श्री. विकास दिनकर पाटील

अर्जदार व प्रतिवादी यांनी दिनांक २५/११/२०२५ रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान तोंडी युक्तिवाद सादर केला. तसेच मा. संचालक यांनी दिलेल्या निर्देशानुसार अर्जदारांनी लेखी खुलासा सादर केला.
त्यानंतर मा. संचालकांनी जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, सांगली यांना दिनांक २६/११/२०२५ रोजी संबंधित संस्थेस भेट देऊन अधिक प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून आकारण्यात आलेल्या प्रवेश शुल्काबाबत तसेच शिक्षकांच्या नेमणुकांबाबतची माहिती व पुरावे संकलित करून त्याबाबतचा अहवाल दिनांक २७/११/२०२५ रोजी सादर करण्याचे आदेश दिले.
त्यानुसार सदर प्रकरण आदेशासाठी राखून ठेवण्यात आले (Case Closed for Order).

## अर्जदार यांचा युक्तिवाद

४. अर्जदारांनी नमूद केले की :

- श्री व्यंकटेश्वरा शिक्षण संस्था पेठ संचलित, रामचंद्र मसू महाडीक ज्यु. कॉलेज पेठ, ता. वाळवा, जिल्हा सांगली या संस्थेत इलेक्ट्रीकल मेन्टेनन्स या व्यवसाय अभ्यासक्रमाची १ तुकडी मंजूर आहे. तसेच विज्ञान शाखेची देखील १ तुकडी मंजूर आहे. तथापि संस्थेने व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता ५० विद्यार्थ्यांची असताना अधिकच्या ३० विद्यार्थ्यांना शैक्षणिक सत्र २०२३-२४ मध्ये प्रवेश केले आहेत, ही बाब चुक झालेली आहे व ती मान्य आहे अशी कबुली संस्थेने दिलेली आहे असे जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी सांगली यांनी सांगितले.
- सदर ३० विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले असून त्यांनी फेब्रुवारी २०२५ मध्ये उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा २०२५ दिलेली आहे.

## प्रतिवादी यांचा युक्तिवाद

५. प्रतिवादी संस्थेच्या प्राचार्यांनी नमूद केले की -

- संस्थेला इलेक्ट्रीकल मेन्टेनन्स अभ्यासक्रमाच्या एका तुकडीस प्रवेश क्षमता ५० विद्यार्थी मान्यता मिळालेली आहे.
- शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये स्थानिक पालक व विदयार्थी यांच्याकडून इलेक्ट्रिकल मेन्टेनन्सला प्रवेश मिळन्याकरीता मोठ्या प्रमाणात मागणी, विनंती व आग्रह झाला. महाविद्यालयाकडे प्रवेशासाठी लेखी स्वरूपातले अर्ज पालकांनी जमा केले. संस्थेकडून विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये त्यांचे हित साधले जावे या उद्देशाने अधिकचे प्रवेश करावेत मात्र तात्काळ दुसर्या तुकडीची मान्यता घेण्याची कार्यवाही करावी असे सूचित करण्यात आले. त्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये इयत्ता ११वी मध्ये मंजूर प्रवेश क्षमता ५० असताना अधिकचे ३० प्रवेश इलेक्ट्रिकल मेंटेनन्ससाठी करण्यात आले आणि लगेच दुसर्यां तुकडीच्या मंजुरीसाठी प्रस्ताव जिल्हा परिषद सांगली येथे दाखल करण्यात

आला.उच्च माध्यमिक शिक्षण विभागाकडून दुसऱ्या तुकडीला लगेच मान्यता घेऊन इलेक्ट्रिकल मेंटेनन्सच्या दुसऱ्या तुकडीस अप्लाय करता येईल प्रवेश रीतसर होतील या अपेक्षेने आम्ही अनावधानाने जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी सांगली यांचे कडून अधिकच्या ३० प्रवेशांना मान्यता घेतली नाही.

- सदर ३० विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले असून त्यांनी फेब्रुवारी २०२५ मध्ये उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा २०२५ दिलेली आहे.
- शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पूर्वी कोणत्याही शैक्षणिक वर्षामध्ये तसेच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये देखील इयत्ता ११वी साठी आम्ही ५० पेक्षा अधिक एकही प्रवेश केलेला नाही.
- सदर चूक मान्य असून भविष्यात अशा प्रकारचे अनधिकृत प्रवेश केले जाणार नाहीत अशी हमी देऊन संस्थेच्या प्राचार्यांनी संस्थेवर कमीत कमी शास्ती लादण्यात यावी, अशी विनंती केली.

## निष्कर्ष

सहसंचालक अर्जदार यांचा अहवाल, सत्यशोधन समिती अहवाल, संस्थेचे लेखी युक्तिवाद, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी सांगली अहवाल यांचा विचार करून निष्कर्ष खालील प्रमाणे :

१. श्री व्यंकटेश्वरा शिक्षण संस्था पेठ संचलित, रामचंद्र मसू महाडीक ज्यु. कॉलेज पेठ, ता. वाळवा, जिल्हा सांगली या संस्थेत इलेक्ट्रीकल मेन्टेनन्स या व्यवसाय अभ्यासक्रमाची १ तुकडी मंजूर आहे. तसेच विज्ञान शाखेची देखील १ तुकडी मंजूर आहे. तथापि संस्थेने व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता ५० विद्यार्थ्यांची असताना अधिकच्या ३० विद्यार्थ्यांना शैक्षणिक सत्र २०२३-२४ मध्ये प्रवेश केले आहेत.

२. सदर संस्थेतील अधिकचे ३० प्रवेशित विद्यार्थी यांनी फेब्रुवारी २०२५ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केल्यामुळे त्यांचे प्रवेश रद्द करणे शक्य नाही.

३. संचालनालयाच्या दिनांक ७ ऑगस्ट २०२५ च्या सुधारित कार्यालयीन आदेशान्वये गठीत करण्यात आलेल्या सत्यशोधन समितीच्या (Fact Finding Committee) अहवालानुसार सदर संस्थेची अंतिम सुनावणी दिनांक २५ नोव्हेंबर २०२५ रोजी घेण्यात आली.

४. सदर सुनावणीत दिलेल्या सूचनेनुसार जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांनी संस्थेस भेट देऊन केलेल्या दस्तऐवज पडताळणीनुसार, संस्थेने इयत्ता ११ वी साठी रु. ५,०००/- व इयत्ता १२ वी साठी रु. ६,०००/- इतकी फी विद्यार्थ्यांकडून आकारलेली असल्याचे निष्पन्न झाले आहे.

५. संस्थेस परिणामांची कल्पना असताना देखील विद्यार्थ्यांची दिशाभूल करण्यात आली.

६. त्यामुळे सदर प्रकरणात संस्थेकडून अधिनियम, २०१३ मधील कलम ३ चे स्पष्ट उल्लंघन झालेले असून, त्याअनुषंगाने अधिनियमाच्या कलम ४ नुसार संस्था शास्तीस पात्र ठरते.

यास्तव मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१) शैक्षणिक वर्ष २०२३-२४ वगळता इतर कोणत्याही शैक्षणिक वर्षात संस्थेने मंजूर क्षमतेपेक्षा अधिक प्रवेश केलेले नाहीत, असे अभिलेखावरून स्पष्ट होते.

२) त्यामुळे सदर संस्थेवर रु. ४,००,०००/- (अक्षरी रुपये चार लाख मात्र) इतकी आर्थिक शास्ती लादण्यात येत आहे.

३) संस्था भविष्यात कोणत्याही अभ्यासक्रमास शासनाची मान्यता नसताना विद्यार्थ्यांची दिशाभूल करून अथवा अन्य कोणत्याही प्रकारे अनधिकृत प्रवेश करणार नाही, याबाबतचे हमीपत्र सक्षम प्राधिकरणाकडे सादर करावे.

४) प्रस्तुत निर्णयाची माहिती सर्व संबंधितांना कळविण्यात यावी.

या सुनावणी आदेशाबाबत संस्थेस अपील करावयाचे असल्यास अधिनियमातील कलम ७ अन्वये नियुक्त अपिलिय अधिकारी, सहसचिव, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांचेकडे आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांत अपिल करता येईल.

स्थळ - मुंबई
दिनांक - 07/01/2026

(माधवी सरदेशमुख)(भा.प्र.से)
संचालक